संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

# विद्यापीठाला ख्यातनाम गायिका अनुराधा पौडवाल यांची सदिच्छा भेट

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला सर्वोदय फाऊन्डेशनच्या अध्यक्ष तथा ख्यातनाम गायिका पद्मश्री डॉ. अनुराधा पौडवाल यांनी सदिच्छा भेट दिली. प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी भेटीप्रसंगी त्यांचे पुस्तक देवून स्वागत केले. यावेळी कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. अनुराधा पौडवाल यांनी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसराची पाहणी केली. विद्यापीठ परिसरातील जलसंवर्धन, वृक्षवल्ली, त्याचे नियोजन, या कार्यासाठी विद्यापीठाला मिळालेले राष्ट्रीय पुरस्कार आदींबाबत प्र-कुलगुरूंनी त्यांचेशी चर्चा केली. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या पुढाकाराने सर्वोदय फाऊन्डेशनशी सामंजस्य करार करण्यात येणार आहे. या फाऊन्डेशनच्यावतीने जलसंवर्धनाचे विविध प्रकल्प विविध गावांत तसेच महाराष्ट्रातील विद्यापीठात राबविल्या जात असून यापूर्वी त्यांनी नांदेड व नागपूर विद्यापीठांना जलसंवर्धनासाठी मार्गदर्शन व तांत्रिक साहाय्य पुरविले आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात अशाप्रकारचा प्रकल्प उभा करुन विद्यापीठांतर्गत येणाऱ्या विविध गावांना त्याचा फायदा व्हावा, जलसाक्षरता वाढावी व दुष्काळावर मात व्हावी, हा प्राथमिक उद्देश प्रकल्प करण्यामागचा असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठात जलसंवर्धनांतर्गत दोन मोठे तलाव व अनेक बंधाऱ्यांची निर्मिती करण्यात आली असून त्या माध्यमातून जलसंवर्धन केल्या जात आहे. विद्यापीठाच्या पुढाकारामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास निश्चितच फायदा झाला आहे. त्याचा फायदा विद्यापीठ परिसरासह आजूबाजूच्या परिसरांनाही होत आहे. जलसंवर्धनाच्या कार्यात सर्वोदय फाऊन्डेशनतर्फे मशीनरी व्यवस्था व तांत्रिक साहाय्य आदी पुरविण्यावर भर देण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे व त्यांची चमू कार्यरत आहेत.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २५/०७/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी